# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांमधील विविध अभ्यासक्रमांचे नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार व निरंतर संलग्नीकरणासाठीचे Online प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार व निरंतर संलग्नीकरण Online प्रस्ताव सादर करण्याबाबत कार्यक्रम व सुचना खालीलप्रमाणे आहेत.**

| | |
|---|---|
| संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी निरंतर संलग्नीकरण नसलेल्या अभ्यासक्रमांचे नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार मान्यता प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. यासाठी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्थांनी नुतनीकरण व नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात व प्रत्येक अभ्यासक्रमासाठी विहीत शुल्कासह Online विद्यापीठास कार्यालयीन वेळेपुर्वी सादर करण्याची मुदत | दि.३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत |
| ज्या संलग्न महाविद्यालये/ मान्यता प्राप्त संस्थांना निरंतर संलग्नीकरणासाठी प्रस्ताव सादर करावयाचे आहेत. त्यांनी प्रस्ताव विद्यापीठाच्या विहीत नमुन्यात विहीत शुल्कासह Online विद्यापीठास कार्यालयीन वेळेपुर्वी सादर करण्याची मुदत | दि.३१ ऑगस्ट, २०२२ पर्यंत |

**सुचना :**

- महाविद्यालयांनी नुतनीकरण/नैसर्गिक विस्ताराचे सर्व अभ्यासक्रमांचे प्रस्ताव एकाचवेळी सादर करावेत
- प्रस्ताव सादर करण्यास विद्यापीठाने दिलेल्या लिंकचा वापर करणेसाठी महाविद्यालयाचा लॉगिन व पासवर्डचा वापर करावा.
- महाविद्यालयांनी नुतनीकरण, नैसर्गिक विस्तार, निरंतर संलग्नीकरण, प्रयोगशाळा मान्यता इ. बाबतचे प्रस्ताव सादर करताना महाविद्यालयांनी **http://sukapps.unishivaji.ac.in/onlineaffiliation/#/login** या लिंकचा वापर करावा.
- सदर प्रस्तावाचे रु ५००/- इतके शुल्क Online महाविद्यालयाच्या लॉगीनमध्ये भरणे आवश्यक आहे
  **(Fees & Receipt मेन्यूमध्ये Affiliation form fees या मेन्यूमध्ये फी भरणेचा ऑप्शन उपलब्ध करून दिला आहे.)**
- दि. ०१ सप्टेंबर, २०२२ पासून रू. १२००/- प्रति महिना प्रती अभ्यासक्रम विलंब शुल्क आकारले जाईल.
- ज्या महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमास विद्यापीठ अधिकर मंडळाने अटींच्या अधिन राहून संलग्नीकरणाचे नुतनीकरण दिलेले आहे. अशा महाविद्यालयांनी त्रुटी पुर्तता अहवाल विद्यापीठास सादर केल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा नुतनीकरणाचा प्रस्ताव स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
- जी महाविद्यालये निरंतर संलग्नीकरण प्रस्ताव सादर करणार आहेत, त्यांनी पुर्वीच्या नुतनीकरण पत्रासह चालू नुतनीकरण प्रस्ताव व निरंतर संलग्नीरण प्रस्ताव Online एकाच वेळेस सादर करावेत.
- महाविद्यालयांनी वार्षिक संलग्नीकरण शुल्क भरले नसल्यास नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार/ निरंतर संलग्नीकरण प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.
- प्रस्ताव व शुल्क एकाचवेळी जमा करून घेतले जाईल.

आपला विश्वासू,

श्री विलास एस सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. : संलग्नता/टी-२/ No 0 0 1 1 1
दि. 30 JUL 2022

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

D:\ssv\Circular.docx